मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | गुरुवार, दि. 27 जून 2024 | पान- 1

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# दोन्ही अतिरिक्त आयुक्तांची कानउघडणी

## पालखी मार्गात कोणताही अडथळा नको म्हणून मार्गावरील अनधिकृत टपऱ्या, अतिक्रमणे हटविण्याच्या सुचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातून संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढीवारी पालखी सोहळा मार्गस्थ होत आहे. पालखी मार्गात कोणताही अडथळा नको म्हणून पालखी मार्गावरील अनधिकृत टपऱ्या, अतिक्रमणे हटविण्याच्या सुचना केल्या आहेत. तसेच मेट्रोचे काम थांबण्याच्या सुचना केल्या आहेत. ते जर थांबले नसेल तर त्यांचेही कामही बंद करण्यात येणार आहे. अशी माहिती आयुक्त राहूल महिवाल यांनी दिली.



महिवाल म्हणाले की, रविवारी अचानक झालेल्या पावसाने आपत्ती व्यवस्थापन आणि महापालिकेचे संबंधित विभागाकडून व्यवस्थित कामे झाली नसल्याचे दिसून येत आहे. शहरात मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे शहर तुंबले. त्या पार्श्वभुमीवर आयुक्त राहुल महिवाल यांनी आढावा घेत दोन्ही अतिरिक्त आयुक्तांची चांगलीच कानउघाडणी केली. तसेच नागरिकांना झालेल्या गैरसोयीबद्दल अधिकाऱ्यांनाही धारेवर धरत तंबी दिली आहे. शहरात रविवारी पावसाने कहर केला. चिखली, भोसरी, कुदळवाडी, मोशीमध्ये ढगफुटीसदृश पाऊस झाला. यामुळे शहरातील रस्त्याने नदी, नाल्याचे स्वरुप प्राप्त झाले. पाऊस जास्त झाल्याने शहर तुंबल्याचा दावा महापालिकेने केला असला तरी पाणी तुंबण्याचे खरे कारण समोर आले आहे.

शहरात पावसाळी लाईनमध्ये पाणी पुरवठ्याची पाईपलाईन आडवी येणे, एमएनजीएलची गॅस पाईप लाईन मध्ये येणे, तसेच ऑप्टिकल फायबर केबल्स डकमधून नव्हे तर पावसाळी लाईनमधून टाकल्याने वाट लागल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शहरात अनेक ठिकाणी पाणी साचण्याचे प्रकार घडून शहर पाण्याखाली गेल्याची स्थिती निर्माण झाली. त्यामुळे आयुक्तांनी सोमवारी (दि.२४) सकाळीच आढावा बैठक घेत कामात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याची सूचना केल्या आहेत.

> “ शहरातील ज्या भागात पाणी साचले होते. त्या भागात आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य, जलनिस्सारण, स्थापत्य यासह अन्य विभागातील अधिकारी-कर्मचा-यांची टीम सकाळपासून कामाला लागली आहे. पाणी साचल्याने अजून चांगली तयारी करायला हवी. साफसफाईची योग्य कामे झालेली दिसत नाहीत. नाल्यासह ड्रेनेज लाईन, स्टार्म वॉटर लाईनमधील कचरादेखील काढायला हवा. अचानक पाऊस आला. त्यामुळे आता यापुढे तरी सुधारणा करायला हवी. आकुर्डी, चिखली, पिंपरी भागात पाणी जास्त साचून राहिले. आकुर्डी करसंकलन कार्यालयातदेखील पाणी होते. आता संबंधिताना सक्त ताकीद दिली. यापुढे जबाबदारी निश्चित करुन कारवाई केली जाईल.
>
> **- राहुल महिवाल, आयुक्त, महापालिका, पिंपरी चिंचवड.**

### पालखी मार्गाची पाहणी

**» संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी मार्गस्थ होत आहे. त्या मार्गात कोणताही अडथळा नको. म्हणून अनधिकृत टपऱ्या, अतिक्रमणे हटविण्याच्या सुचना केल्या आहेत. महामेट्रोचे काम थांबण्याच्या सुचना केल्या आहेत. ते जर थांबले नसेल तर त्यांचेही कामही बंद करण्यात येणार आहे. तसेच सुट्टीवर असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सुट्टया रद्द करण्यात आल्या आहेत. आज मंगळवारी पालखी मार्गाची पाहणी करणार आहे, असेही राहूल महिवाल यांनी सांगितले.**

# शहरात 1 हजार 450 घरांमध्ये आढळल्या ‘डेंगीच्या अळ्या’

## घरांसोबत शहरातील पंक्चर व भंगाराची दुकाने, बांधकामे व इतर ठिकाणाची तपासणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

घर व परिसरामध्ये साफसफाई न ठेवल्याने परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर डासांची पैदास होते. पिंपरी चिंचवड शहरातील अशा घरांची तपासणी करण्यात येत आहे. आतापर्यंत २२ दिवसांत १ हजार ४५० घरांमध्ये डेंगीच्या आढळून आल्या आहेत. त्या घरमालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. एकूण ७२ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. घरांसोबत शहरातील पंक्चर व भंगाराची दुकाने, बांधकामे व इतर ठिकाणाची तपासणी आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.

पावसाळा सुरू झाल्याने डेंग्यू, मलेरिया यासह साथीच्या आजारांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. त्यासाठी आरोग्य विभागाकडून पाहणी करण्यात येत आहे. शहरात डेंगी डासांची पैदास होणारी ठिकाणी नष्ट करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. यामध्ये शहरातील घरे, जुनी व नवीन बांधकामे तसेच, पंक्चर व टायर आणि इतर आस्थापनांची तपासणी केली जात आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाच्या वतीने गेल्या २२ दिवसांमध्ये १ लाख १ हजार १९५ घरांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये १ हजार ४५० घरांमध्ये डेंगीच्या आळ्या आढळल्या. तर २८२ टायर व पंक्चर आणि भंगारच्या दुकानाची तपासणी करण्यात आली. शहरात अनेक ठिकाणी बांधकामे सुरू आहेत. याठिकाणी पाणी साचत असल्याने त्यामध्ये डेंगीच्या अळ्यांची पैदास होते. पथकाच्या वतीने अशा २८० बांधकामांचीही तपासणी करण्यात आली. डेंगीच्या अळ्या आढळलेल्या ठिकाणच्या मालकांवर कारवाई करण्यात आली आहे. अशा मालकांची संख्या १४ असून, त्यांच्याकडून ७२ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. तर ज्या नागरिकांनी आपल्या परिसरात स्वच्छता ठेवलेली नाही, अशा ५८५ मालकांना नोटीस बजावण्यात आली आहे.



शहरामध्ये आरोग्य विभागाच्या पथकाकडून सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्यामध्ये डास आणि डेंगीच्या अळ्या सापडलेल्या घरमालकांना नोटीस बजावण्यात आली असून, काही जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. नागरिकांनी आपले घर व परिसर स्वच्छ ठेवावे. कुंड्या, फ्रीजच्या खाली, आदी ठिकाणी पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. परिसरात पाणी साचू देऊ नये. त्यामुळे डासांची पैदास होणार नाही. पंक्चर व भंगार दुकाने व बांधकाम ठिकाणाचीही तपासणी केली जाणार आहे, असे आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# अनधिकृत पब, बार, रेस्टॉरंटला दणका

## पुणे महापालिकेची फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील 26 ठिकाणी धडक कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

पोर्शे कार अपघात प्रकरणानंतर फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील 'लिक्विड लिझर लाउंज' (एल थ्री) बारमध्ये ड्रग्ज पार्टी झाल्याचे समोर आल्याने पुण्यात खळबळ उडाली. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिल्यानंतर पुणे महापालिकेने मंगळवारी (दि. २५) पोलिसांच्या मदतीने एफसी रस्त्यासह शहरातील तब्बल २६ ठिकाणांवरील पब, बार, रेस्टॉरंटवर धडक कारवाई केली.

महापालिकेने ३६ हजार चौरस फूट इतके बेकायदा बांधकाम पाडण्याची जोरदार कारवाई केली. अनधिकृत बांधकाम पाडून महापालिकेने पुन्हा एकदा हॉटेल चालकांना चांगलाच दणका दिला आहे. महापालिकेने 'एल थ्री' या बारवरदेखील कारवाई करून १२५ चौरस फूट इतके बेकायदा बांधकाम पाडले. तसेच या भागातील हॉटेल चालकांनी महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता हॉटेलमध्ये बदल केले होते. त्यामुळे महापालिकेने कारवाईची नोटीस पाठविली होती. त्यानुसार ही कारवाई केल्याचे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले.




एफसी रोडवरील 'एल थ्री' या बारमध्ये रविवारी मध्यरात्री दीडनंतर ड्रग्ज पार्टी झाली होती. या ड्रग्ज तसेच दारू पार्टीचा एक व्हीडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला होता. त्यानंतर पुण्यात खळबळ उडाली होती. पोलिसांनी या प्रकरणाची माहिती घेत एल थ्री बारवर कारवाईचे सत्र सुरू केले. मॅनेजरसह आठ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच या पार्टीमध्ये सहभागी झालेल्या ४० ते ५० जणांची माहिती घेतली जात आहे. मध्यरात्री दीडनंतर बारचे मुख्य गेट बंद करून मागच्या दाराने पार्टीमध्ये तरुण-तरुणींनी प्रवेश केला होता. त्यानंतर ही पार्टी पहाटे पाचपर्यंत रंगली होती. या पार्टीमध्ये तरुण ड्रग्जचे सेवन करत असल्याचे या व्हीडीओमध्ये स्पष्ट दिसत होते. त्यामुळे अनधिकृत पब, बारवर कारवाई करण्याची मागणी पुणेकरांनी केली होती.

पुण्यात ड्रग्जची पार्टी झाल्याचे समोर येताच विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर संताप व्यक्त केला होता. त्याची दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहरातील बेकायदा पद्धतीने चालविले जाणारे पब आणि बारवर बुलडोझर फिरवा, असे आदेश महापालिका आयुक्तांना दिले होते. त्यानंतर मंगळवारी महापालिका प्रशासन ॲक्टिव्ह मोडवर आल्याचे दिसून आले. एका दिवसात २३ ठिकाणी कारवाई केली असल्याचे आयुक्त भोसले यांनी सांगितले.

### वैशाली हॉटेल, शिरोळे मॉलवरही कारवाई

बांधकाम विकास विभागाचे वतीने एफसी रस्त्यावर जोरदार कारवाई केली. यामधे हॉटेल, बार, दुकाने यांचे फ्रंट आणि साइड मार्जिन यामध्ये असलेल्या विनापरवाना शेड काढून टाकण्यात आल्या. यापूर्वीसुद्धा या सर्व हॉटेलवर कारवाई केली होती. मात्र संबंधितांनी परत शेड उभारल्या होत्या. यामधे पत्रा, प्लास्टिक कापड आदींचा वापर केला होता. यामधे वैशाली हॉटेल, शिरोळे मॉलचा काही भाग, कल्चर हॉटेल आदींचा समावेश आहे.

### पोलिसांचा बंदोबस्त मिळाला

» महापालिकेकडून अतिक्रमण कारवाईसाठी स्थानिक पोलीस बंदोबस्ताची मागणी केली जाते. मात्र, प्रत्येक वेळी पोलिसांकडून बंदोबस्त देण्यास टाळाटाळ केली जाते. मात्र, या प्रकरणात थेट मुख्यमंत्र्यांनी स्वत: पोलीस आयुक्तांनी आदेश दिल्याने मंगळवारी दिवसभर पोलिसांकडूनच महापालिकेच्या आधिकाऱ्यांशी संपर्क साधत कुठे आणि किती बंदोबस्त हवा आहे, याबाबत योग्य तो समन्वय साधण्यात आला. त्यानुसार महापालिकेला सदर कारवाईसाठी मागणीप्रमाणे पोलीस बंदोबस्त पुरवण्यात आला. महापालिकेनेही वेळ न घालवता तत्काळ कारवाई करत अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर फिरविला.

# सात दिवस सगळे पब, बार बंद करा

## पुणे कामातून गेले : प्रतिमा बदलण्यासाठी मंत्री चंद्रकांत पाटील यांची सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्याचे पब्स आणि बार काही दिवसांसाठी बंद ठेवावे. त्यांनंतर पुणेकरांनी एका व्यासपीठावर एकत्र येवून याबाबत नियमावली बनवायला हवी. अशी सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'पुणे कामातून गेले' ही प्रतिमा बदलण्यासाठी केली.

पब्स आणि बार सुरू असताना त्याबद्दल नियमावली बनवण्याला काही मर्यादा आहेत. त्यापेक्षा सात दिवस सर्व पब्स आणि बार बंद ठेवावे. त्यांनंतर सर्वांनी एकत्र येऊन एक नियमावली बनवावी आणि त्या नियमावलीची अंमलबजावणी करण्याचा सर्वांनी प्रयत्न करावा. अशी सूचना पाटील यांनी आज केली. ते पुण्यात प्रसार माध्यमांशी बोलत होते.



मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, पब्स आणि बार मध्ये जाणाऱ्यांना रात्रभर दारू पिण्याची आणि अमली पदार्थांचे सेवन करण्याची परवानगी नाही. तसेच विषारी दारू बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये काम करणारे कामगार बेरोजगार होतील, म्हणून त्यांना विषारी दारू बनवू द्या किंवा पब्स-बार मधील कर्मचारी बेरोजगार होतील म्हणून पब्स पहाटे चार वाजेपर्यंत चालू द्या असं म्हणून चालणार नाही. या संदर्भात वेगळे नियम तयार झाले पाहिजे. या क्षेत्रातील लोकांना वेगळ्या प्रकारच्या रोजगाराकडे वळवायला हवं.

फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील एल थ्री लिक्विड लेजर लाऊंज या हॉटेलमध्ये पहाटेपर्यंत मद्य पार्टी आणि त्यामधून ड्रग्ज सेवन सुरू असल्याचा व्हिडीओ समोर आला होता. त्यानंतर वातावरण चांगलेच तापले आहे. दरम्यान, 'एल थ्री' बारचा परवाना रद्द करण्याचे आदेश मंगळवारी देण्यात आले असून या बारमध्ये बेकायदा पार्टीत अमली पदार्थ सेवन करणाऱ्या दोन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### पाणीप्रश्नावर चंद्रकांत पाटील काय म्हणाले?

राज्यात सध्या पाणी प्रश्न गंभीर होत चालला आहे. यावर चंद्रकांत पाटील यांनी भाष्य केलं. मुख्यमंत्र्यांनी सगळ्यांना आवाहन केलं की आपल्या जिल्ह्यामध्ये जुलै च्या शेवटपर्यंत किमान पिण्याचे पाणी शिल्लक ठेवून काय करायचं आहे ते करा. मी कठोरपणे शिव्या खाऊन उजनीच्या धरणाचं नियोजन केलं. म्हणून मी समाधानी आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोलापुरात निर्माण झाला नाही. अनेकांनी मला शिव्या घातल्या. उजनी मायनसमध्ये सुद्धा किती जाऊ द्यायची. उजनी परिसरामध्ये गेल्या काही दिवसा न आधी पाऊस झाला की उजनीच पाणी हे सात टीएमसीने वाढलं. जसजसा पाऊस धरण क्षेत्रात पडेल तसतसा हा पाणी प्रश्न सुटेल, असं चंद्रकात पाटील यांनी म्हटलं आहे.

# इंद्रायणी प्रदूषणावर पुन्हा कागदी घोडे

## पिंपरी-चिंचवड महापालिकेसह इंद्रायणीलगतच्या नगरपरिषद, ग्रामपंचायतींना नोटीस

**पिंपरी | प्रतिनिधी**

आषाढी वारीच्या तोंडावर इंद्रायणी नदी फेसाळली आहे. वारकऱ्यांच्या जिवाशी सातत्याने खेळले जातेय. नदी प्रदूषणाचा हा खेळ लोणावळा ते पिंपरी चिंचवड दरम्यान होत असल्याचा निष्कर्ष आता समोर आला आहे.

त्याचअनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांना नोटीस धाडली आहे. या आस्थापनांनी कार्यालयांनी त्यांचे एसटीपी प्लांट अद्यावत केले नसल्याने तसेच त्यातून दूषित पाणी नदीत सोडल्याने इंद्रायणीची अशी दयनीय अवस्था झाल्याची बाब प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हेक्षणात समोर आली आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून केवळ सर्वेक्षण आणि चर्चांच्या पुढे कार्यवाही जात नसल्याचे दिसून आले आहे. संबंधित विभाग केवळ कागदी घोडेच नाचवत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.

पिंपरी चिंचवड हद्दीतील काही कंपन्या नदीत रसायनयुक्त पाणी सोडत असल्याची ओरड होती. मात्र आता अशी कोणतीच कंपनी नदीत रसायनयुक्त सांडपाणी सोडत नसल्याचा दावा प्रदूषण मंडळाने केला आहे. हा दावा करतानाच पिंपरी चिंचवड महापालिका ते लोणावळा दरम्यानच्या नगरपरिषद आणि ग्रामपंचायतींना यात दोषी ठरविले आहे. मात्र केवळ नोटीस बजावून इंद्रायणी नदी मोकळा श्वास घेणार का? याचे उत्तर प्रदूषण मंडळाकडे नाही.

उल्लेखनीय बाब अशी यापूर्वी देखील हिवाळी अधिवेशनात या विषयावर चर्चा झाली होती. परंतु इंद्रायणी प्रदूषणाचा मुद्दा केवळ चर्चा आणि पत्रकबाजी पुरता उरला आहे की अशी शंका उपस्थित होत आहे.

त्यामुळे प्रदूषण मंडळाने केवळ नोटीसी धाडण्यात धन्यता न मानता या शासकीय कार्यालयांवर ठोस कारवाई करणे गरजेचे आहे. तेव्हाच वारकऱ्यांच्या जीवाशी सुरू असलेला खेळ थांबेल.



### आमदारांनी घेतली पिंपरी महापालिकेची कड

» दरम्यान, लोणावळा नगरपरिषद, वडगाव नगर पंचायत, तळेगाव दाभाडे नगर परिषद, देहुरोड कॅन्टोन्मेंट, देहू नगर पंचायत आणि आळंदी नगर परिषद यासह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,एमआयडीसी व जिल्हाधिकारी प्रशासन यांनी एकत्रितपणे नदी सुधार प्रकल्पावर काम करण्याची आवश्यकता आहे. इंद्रायणी नदी प्रदूषणाचा उगमापासून वढू-तुळापूर येथील संगमापर्यंत असलेले स्थानिक स्वराज्य संस्था जबाबदार आहेत. हा केवळ पिंपरी-चिंचवड महापालिकेशी संबंधित प्रश्न नाही. त्यामुळे व्यापक पातळीवर उपाययोजना ही इंद्रायणी पुनरूज्जीवनासाठी अत्यावश्यक बाब आहे, असे आमदार लांडगे यांचे म्हणणे आहे. नासाठी अत्यावश्यक बाब आहे, असे आमदार लांडगे यांचे म्हणणे आहे. कामाला गती देण्याची अपेक्षा आहे.

### नदीच्या प्रदूषणात सातत्याने वाढ

» मागील अनेक वर्षांपासून नदीच्या प्रदूषणात सातत्याने वाढ होत आहे. अनेक वर्षांपासून वारकरी आणि गावकऱ्यांनी यासंदर्भात प्रशासनानाला निवेदने दिली आहेत. मात्र त्यावर कोणीही तोडगा काढला निघाला नाही आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी प्रस्थान सोहळा काही तासांवर येऊन ठेपलेला असताना, इंद्रायणी नदी फेसाळल्याने वारकऱ्यांमध्ये मोठा रोष निर्माण झाला आहे. वारकरी इंद्रायणी नदीच्या पाण्यात स्नान करतात. पाणी तीर्थ म्हणून पितात. त्यामुळे या नदीकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### सात महिने उलटले तरी परिस्थिती जैसे थे

» गेल्यावर्षी नोव्हेंबर महिन्यात कार्तिकीवारीपूर्वी इंद्रायणीनदी मोठ्या प्रमाणावर फेसाळलेली होती. त्यावेळीदेखील कोणत्याच यंत्रणेला हा विषय गांभिर्याने घ्यावा, असे वाटले नाही. आता सात महिन्याच्या कालावधीनंतरही नदी प्रदूषणाचा विषय ‘जैसे थे’ आहे. आता प्रसारमाध्यमाममधून यावर सडकून टिका होऊ लागल्याने खडबडून जागे झालेल्या यंत्रणेने तयावर कार्यवाही सुरू केल्याचे दाखविण्यास सुरुवात केली आहे. लागल्याने खडबडून जागे झालेल्या यंत्रणेने तयावर कार्यवाही सुरू केल्याचे दाखविण्यास सुरुवात केली आहे.

---

# हातगाड्या, पथारीवाल्यांचे तळेगावात अतिक्रमण

## रस्त्याच्या दोन्ही बाजूला हातगाड्या आणि पथारीवाल्यांची संख्या वाढली त्यामुळे वाहनचालकांची कसरत

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगाव स्टेशन ते जिजामाता चौक दरम्यानच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला हातगाड्या आणि पथारीवाल्यांची संख्या वाढली आहे. ग्राहकही रस्त्याच्या दुतर्फा वाहने लावत आहेत. त्यामुळे, वाहनचालकांना वाहनांसाठी अरुंद रस्त्यातून जाताना कसरत करावी लागत आहे. तसेच अपघाताच्या घटनाही घडत आहेत. या रस्त्यावर वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब झाली आहे. या रस्त्यावरील विविध वस्तू व फळ, भाजी विक्रेत्यांच्या अतिक्रमणांवर नगरपरिषदेने कारवाई करावी, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांनी केली आहे.

तळेगाव स्टेशन ते जिजामाता चौक दरम्यानच्या या परिसरात वाहतूक पोलिसाची नेमणूक करणे गरजेचे आहे. काका हलवाई चौकात जवळचा रस्ता म्हणून हिंदमाता भुयारी मार्गाने आलेले वाहनचालक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून गाव व स्टेशन भागात ये-जा करतात. या रस्त्यावर इंग्रजी माध्यमाच्या पाच शाळा, सात मोठे दवाखाने व बँका असल्याने वाहनचालक रस्त्यावरच वाहने लावतात. काही महिन्यांपूर्वी स्टेशन भागातून आलेल्या वाहनचालकाचा मोटारीवरील ताबा सुटल्याने रस्त्यावरील वाहनाला पाठीमागून धडक दिल्याची घटना घडली होती. तसेच काका हलवाई चौकात केबल तुटून ती चाकात गुंडाळली गेल्याने बुलेटस्वाराचा मृत्यू झाला होता. शाळा भरताना व सुटताना विद्यार्थी व पालकांची गर्दी होते. त्यामुळे, वाहतुकीची येथे नेहमी कोंडी होते.



> तळेगाव स्टेशन ते जिजामाता चौक या रस्त्यावर नगर परिषदेने अतिक्रमणविरोधी कारवाई केली पाहिजे. या वर्दळीच्या रस्त्यावर काका हलवाई चौकात लवकरच एका वाहतूक पोलिसाची नेमणूक केली जाईल.
>
> **- विशाल गजरमल, सहाय्यक पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा**

> नगर परिषदेची अतिक्रमणविरोधी पथकाची गाडी स्टेशन व गाव विभागात फिरते. फळे व भाजी विक्रेत्यांना तशा सूचनाही दिल्या. मात्र, आता त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.
>
> **- जयंत मदने, प्रमुख, अतिक्रमण विरोधी पथक, तळेगाव**

# माझे जिवीची आवडी, पंढरपुरा नेईन गुढी

## माऊलींच्या प्रस्थान सोहळा चार दिवसांवर : आळंदी प्रशासन सज्ज

**पिंपरी | प्रतिनिधी**

माझे जिवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ॥
पांडुरंगी मन रंगले । गोविंदाचे गुणी वेधले ॥
जागृति स्वप्न सुषुप्ति नाठवे । पाहतां रुप आनंदी आनंद साठवे ॥
बापरखुमादेविवर सगुण निर्गुण । रुप विटेवरी दाविली खुण ॥

आषाढी एकादशीनिमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी राज्यभरातून संतांचे पालखी सोहळे तीर्थक्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहेत. श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी प्रस्थान सोहळा शनिवारी (दि. 29) सायंकाळी 4 वाजता पार पडणार आहे. माऊलींचा पालखी सोहळा राज्यात सर्वात मोठा आहे.

या सोहळ्यात लाखों वारकरी भाविक सहभागी होऊन माउलींसोबत पंढरपूरला पायी चालत जातात. प्रस्थान सोहळ्याला येणाऱ्या लाखांवर वारकऱ्यांना आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यासाठी, त्यांच्या सुरक्षिततेसाठी आळंदी प्रशासन आता सज्ज झाले आहे.

शहरात विविध ठिकाणी पोलीस मदत केंद्र, आरोग्य बुथ उभारण्यात आलेत. सुरक्षेसाठी गर्दीवर करडी नजर ठेवण्यासाठी गर्दीच्या होणाऱ्या ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात आलेत. फिरते शौचालयांची व्यवस्था करण्यात आलीय.

जनजागृतीसाठी फलक लावण्यात आलेत. इंद्रायणी घाटावर महिलांसाठी तात्पुरत्या चेजिंग रुम उभारल्यात. पिण्याच्या पाण्याचे अतिरिक्त टँकर तैनात करण्यात येत आहेत.

मंगळवारी (दि. 25) आळंदी पोलीस ठाण्यात बंदोबस्तावरील पोलीस अंमलदार, अधिकारी यांना पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, सहायक आयुक्त राजेंद्रसिंह गौर, आळंदीचे वरीष्ठ निरीक्षक भीमा नरके यांनी आवश्यक सूचना दिल्या. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ज्या ठिकाणाहून पालखी जाणार आहे, त्या मार्गावर इतर वाहनांना बंदी घालण्यात आली आहे.



### माऊलींच्या रथाची तीसरी चाचणी यशस्वी

» दरवर्षी माऊलींचा पालखी रथ ओढण्यासाठी नवीन बैलजोडी निवडली जाते. तसेच वर्षभर रथ एका जागी बसून असल्याचे त्याची आवश्यक डागडुजी केली जाते. रथाच्या आवश्यक डागडुजीनंतर मंगळवारी (दि.25) मानाची बैलजोडी जुंपून माऊली भक्तनिवास ते चऱ्होली फाटा (पुणे रस्ता) अशी पालखी रथाची 6 किमी तिसरी चाचणी घेण्यात आली. ही चाचणी यशस्वी झाली. यादरम्यान कोणतीही समस्या आढळली नसल्याचे देवस्थानकडून सांगण्यात आले. याआधी 11 आणि 21 जून रोजी चाचणी घेण्यात आली होती.

> श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढी वारी पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी आळंदीत येणाऱ्या वारकऱ्यांना आवश्यक सोयिसुविधा पुरविण्यासाठी अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक असे 350 पेक्षा अधिक मनुष्यबळ तैनात असणार आहे. सर्व तयारी पूर्ण झाली आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी नगरपरिषद प्रशासन सज्ज झाले आहे
>
> \- कैलास केंद्रे, मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद.

### श्रींच्या खादेकऱ्यांची संख्या 200 निश्चित

» पालखी प्रस्थानादिवशी माऊली मंदिरात पालखी घेण्यासाठी आळंदीतील काही ग्रामस्थांना मान आहे. यावेळी पालखी खांदेकऱ्यांची संख्या 200 इतकी निश्चित करण्यात आली आहे. पोलीस प्रशासन, देवस्थान विश्वस्त, खांदेकरी यांची माऊली भक्त निवास येथे बैठक पार पडली त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला.

### पोलिसांचा तगडा बंदोबस्त

» श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे शनिवारी (दि. 29) तर श्री संत तुकाराम महाराज पालखीचे शुक्रवारी (दि. 28) प्रस्थान होणार आहे. या दोन्ही पालखी सोहळ्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. एखादा संशयित दिसला की त्याला लगेच ताब्यात घेण्यात येणार आहे. तसेच परिसरतील रेकॉर्डवरील गुंडांवरही प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे. वारीवर लक्ष ठेवण्यासाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तसेच काही ठिकाणी टॉवरवरून पोलीस गर्दीवर लक्ष ठेवणार आहेत.

# एसटी पास थेट तुमच्या शाळेत विशेष मोहीम सुरू

## आंबेगाव तालुक्यात शाळा, महाविद्यालयात मिळू लागले मोफत एसटी पास

**पिंपरी | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील मंचर एसटी आगाराच्या माध्यमातून तालुक्यातील विविध शाळा महाविद्यालयात जाऊन एसटी पास, ओळखपत्र पुरवण्याची मोहीम सुरू केली आहे. एसटी प्रशासनातर्फे एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम सुरू केली आहे. अशी माहिती विभागीय वाहतूक अधिकारी कैलास पाटील यांनी दिली.

शाळा- महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्यांकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. जेणेकरून त्यांचा वेळ वाया जाणार नाही. या संदर्भात 18 जूनपासून एसटी प्रशासनातर्फे एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम राबवली आहे.

आंबेगाव तालुक्यातील एसटी आगाराच्या वतीने ही मोहीम राबविण्यात आली असून, हिरकणी विद्यालय गावडेवाडी, भैरवनाथ विद्यालय अवसरी, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर, महात्मा गांधी विद्यालय मंचर,

वाकेश्वर विद्यालय पेठ यासह इतर विद्यालयांना पासचे वाटप करण्यात आले आहे. हे वाटप मंचर आगार व्यवस्थापक बालाजी सूर्यवंशी, उपयंत्र अभियंता दापोडी येथील अर्चना भदाणे, स्थानक प्रमुख साधना कालेकर इतर पर्यवेक्षक, कर्मचारी, वाहतूक नियंत्रण यांनी केले आहे.



### मुलींना मोफत, मुलांना 33 टक्के सवलत

» शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून 33 टक्के सवलत दिली असून केवळ 67 टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येणार आहे. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जात आहे. सनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून 33 टक्के सवलत दिली असून केवळ 67 टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येणार आहे.